# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये झालेले द्वितीय अपिल

## अपिल क्रमांक : केआर -२४/२०१८ मधील संदर्भ तक्रार क्र. १८१४/२०२०

अपिलार्थी, श्री.कैलास गोविंद आव्हाड,
रुम न.९, मुंबईकरांची चाळ, दिवाण बावडी रोड,
जुना दुध नाका, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, कर अधीक्षक, (क) प्रभागक्षेत्र कार्यालय,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

जन माहिती अधिकारी,इस्टेट मॅनेजर, मालमत्ता विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ११/६/२०१८**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ४.१०.२०१७ | -- | १३.११.२०१७ | २०.१२.२०१७ |

अपीलार्थीस दि. ४.१०.२०१७ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली विठाबाई भालेराव खाजगी व्यक्ती C-०२०१४१३२९०० यांनी मालमत्ता कर पावती नावे करण्यासाठी कर विभागात सादर केलेले सर्व कागदपत्रे यांची छायाप्रत न मिळाल्यामुळे आयोगास दि. २.१.२०१८ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपिलावर आज दिनांक ११.६.२०१८ रोजी फास्ट ट्रॅक सुनावणी (Fast Track Hearing) घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांच्या दिनांक ४.१०.२०१७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. मुद्दा क्र.१ व २ ची माहिती मिळाली नाही. आता संबंधित शिपाईची मुलगी सदर १ एकर मालमत्तेवर हक्क सांगत असून, विकासक सदर जागेवर बांधकामाचा प्रस्ताव तयार करत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले की, त्यांनी दिनांक २४.११.२०१७ रोजी उपलब्ध माहिती दिली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आजच्या सुनावणीस असे स्पष्ट झाले की, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शाळेच्या जागेवर सेवानिवृत्त शिपाई यांचे कुंटुंबिय अनधिकृतरित्या ताबा मिळवित आहेत व महानगरपालिकेच्या कर विभागातील अधिकारी यांनी त्यांच्या नावावर महानगरपालिकेच्या मालमत्तेवर कर लाऊन दिलेला आहे.
२. **सार्वजनिक प्राधिकरण तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका** यांनी सदर प्रकरणाच्या सर्व कागदपत्रांची चौकशी करून, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्या मार्फत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७ (६) व ७(९) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, **अपिलार्थीस उपलब्ध माहिती समक्ष १५ दिवसात नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे. तसेच सदर प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांविरूध्द नियमानुसार कारवाई करण्यात यावी.
३. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**सही/-**
**(थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : **११ जून, २०१८.**



KOKAN BANCH

**आदेशातील मुद्दा क्र.२ च्या अनुपालनार्थ प्रत,**
श्री.गोविंद बोडके (भा.प्र.से.),
आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
प्रथम अपिलीय प्राधिकारी, उप आयुक्त (मालमत्ता),
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण,
कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

**विवेचन**

तक्रारकर्ता श्री.कैलास गोविंद आव्हाड यांनी द्वितीय अपिल क्रमांक के.आर. २४/२०१८ मध्ये आयोगाने दिनांक ११ जून, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, त्यांना अद्याप माहिती मिळाली नाही म्हणून आयोगाकडे दि. १४.९.२०२० रोजी कलम १८ (१) (ग) खाली तक्रार दाखल केली आहे. या अपिलासंदर्भातील नस्तीवरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. चंद्रकांत ज. पाटील तथा ३/क, अधिक्षक (कर), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अमित पंडित तथा मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी आयोगाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना अद्याप माहिती दिलेली नसल्याची प्राथमिकरित्या आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. चंद्रकांत ज. पाटील तथा ३/क, अधिक्षक (कर), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अमित पंडित तथा मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ४.१०.२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाने दिनांक ११ जून, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(के.एल.बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ जुलै, २०२१.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना, (२ प्रती) -**
उप आयुक्त (मालमत्ता),
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण,
कल्याण (प.), ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.- यांनी सदर आदेशाची प्रत्येकी एक प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. चंद्रकांत ज. पाटील तथा ३/क, अधिक्षक (कर), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. अमित पंडित तथा मालमत्ता व्यवस्थापक, मालमत्ता विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांना द्यावी व त्याची पोच आयोगास सादर करावी.

**अपिल क्रमांक : केआर -२४/२०१८ मधील संदर्भ तक्रार क्र. १८१४/२०२०**
अपिलार्थी, श्री.कैलास गोविंद आव्हाड,
**सुनावणी** दिनांक ४.१२.२०२३ **( In Continuation of order dt.२२.७.२०२१)**

**विवेचन**

उपरोक्त आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-२० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण ३० दिवसांत आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

KOKAN BANCH

सदर सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. शांताराम तायडे, प्र. अधिक्षक, ३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण हे उपस्थित आहेत.

**सुनावणीचा तपशील :**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. शांताराम तायडे, प्र. अधिक्षक, ३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. चंद्रकांत पाटील, कर अधिक्षक (सेवानिवृत्त), क प्रभाग यांचा दि.२६.११.२०२१ रोजीचा लेखी खुलासा सादर केला असून त्याममध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अपिलार्थी यांनी मागविलेल्या मा. क्र. C०२०१४१३२९०० या मिळकतीची कर आकारणी विशेष नोटीस क्र. बीएलडी/५८६ दि.८.१०.१० मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १६ (२) मधील तरतुदी अन्वये "मालकी हक्क प्रस्तावित नाही." धारक विठाबाई डी भालेराव यांच्यानावे देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांचा मलकी हक्क सिध्द होत नाही. सदर आकारणीवर "अनधिकृत बांधकामावरील कारवाईस बाधा न येता." असा शिक्का मारून कर आकारणी करण्यात आलेली आहे.

सदर मिळकतीचे बांधकाम क्षेत्रफळ २१.०० चौ. मी. इतके नमूद आहे. त्यानुसार सदरची आकारणी एक एकर वर करण्यात आलेली नाही. तरी महानगरपालिकेने आर्थिक उत्पन्न वाढावे म्हणून सहाय्यक माहिती अधिकारी तथा भाग लिपिक एकनाथ शेटे, कर निरिक्षक संगमित्रा मारसे, अधिक्षक चंदुलाल पारचे व प्रभाग क्षेत्र अधिकारी सुहास गुप्ते यांच्या मंजुरीने प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

ते दि.३१.८.२०१९ रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमधून विहित वयोमानाने निवृत्त झाले आहेत. यास्तव त्यांच्यावर शास्ती लादण्यात येऊ नये, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**आदेश**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. चंद्रकांत पाटील, कर अधिक्षक (सेवानवृित्त), क प्रभाग कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी सादर केलेला खुलासा व त्यासोबतच्या कागदपत्रांवरून आयोगाचे समाधान झाले असून त्यांचा दि.२६.११.२०२१ रोजीचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यांना दि. २२.७.२०२१ च्या निर्णयातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात येत आहे. प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

KOKAN BANCH

**(भूपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई :४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२३